* मुख्यमंत्री :-

१. मुख्यमंत्र्याची रचना सांगून अधिकार लिहा.

उत्तर :- भारतीय राज्यघटनेने संसदीय शासन पद्धतीचा अवलंब केंद्र आणि राज्य या दोन्ही मध्ये केला आहे. घटक राज्यातील कार्यकारी मंडळाची विभागणी वास्तविक कार्यकारी प्रमुख म्हणून मुख्यमंत्र्याची निवड केली आहे. तर नाममात्र प्रमुख म्हणून राज्यपालाची निवड केली आहे. मुख्यमंत्री हा राज्याचा खरा प्रमुख असतो.

मुख्यमंत्री राज्याच्या मंत्रीमंडळाचा प्रमुख असतो. भारतीय राज्यघटनेतील कलम 163(1) एक नूसार राज्यपालाला त्याच्या कार्यात सल्ला देण्यासाठी किंवा मदत करण्यासाठी एक मंत्रीपरिषद असेल या मंत्री परिषदेचा मुख्यमंत्री अध्यक्ष असेल अशी तरतूद करण्यात आली.

केंद्रामध्ये जे स्थान पंतप्रधानास असते तेच स्थान घटक राज्यात मुख्यमंत्र्याला असते. राज्याची प्रगती आणि विकास मुख्यमंत्र्याचे नेतृत्व, क्षमता, संघटन कौशल्य यावर अवलंबून असते. मुख्यमंत्री हा राज्यातील शासन व प्रशासनाचा केंद्रबिंदू असतो.

घटक राज्यातील अतिशय महत्वाचे स्थान व पद असणाऱ्या मुख्यमंत्र्या विषयीची रचना खालील प्रमाणे आहे.

1) नियुक्ती (मुख्यमंत्र्याची निवड) :
मुख्यमंत्र्याची निवड संविधानाच्या
कलम १६४(१) नुसार मुख्यमंत्र्याची निवड राज्यपा-
ल करतो. मुख्यमंत्र्याच्या निवडीचा अधिकार
राज्यपालाला असला तरीही राज्यपाल कोणत्या
ही व्यक्तीची मुख्यमंत्री पदी निवड करू शकत
नाही. विधानसभेत ज्या राजकीय पक्षाला बहुम
त प्राप्त आहे. अशा राजकीय पक्षाच्या
नेत्याची राज्यपाल मुख्यमंत्री म्हणून निवड
करतो. जर कोणत्याही राजकीय पक्षाला बहुमत
मिळाले नाही तर तो विधानसभेतील सर्वात
मोठ्या पक्षाच्या किंवा गटाच्या नेत्याची मुख्यमं
त्री पदी निवड करून त्याला एक महिन्याच्या
आत विधानसभेत बहुमत सिद्ध करायला सांगतो.
मुख्यमंत्री पदी विराजमान होणा-
-या व्यक्तिने सहा महिन्याच्या आत घटक
राज्यातील विधीमंडळाचे सदस्यत्व मिळवावे
लागते, अन्य या त्याचे पद रद्द होते.

* मुख्यमंत्र्याचा कार्यकाळ :
संसदीय शासन पद्धतीत
कार्यकारी मंडळाचा कालखंड नेहमीच अनिश्चि
त असतो. सर्व सामान्य परिस्थितीत मुख्यमं-
त्र्याचा कार्यकाळ पाच वर्षाचा असतो. परंतु
विधीमंडळाचा विश्वास गमावल्यास पक्षांतर्गत
फूट पडल्यास मुख्यमंत्री पद केव्हाही जाऊ
शकते. मुख्यमंत्र्याचा कार्यकाळ कमी जास्त
होऊ शकतो. मुख्यमंत्री स्वतः आपला

जबाबदारीतून मु

राजीनामा राज्यपालाकडे देऊन मुख्य
होऊ शकतो. घटक राज्यातील मुख्यमंत्र्याला गोपनिय
पदाचा कारभार स्विकारण्यापूर्वी पद व
शपथ राज्यपाल देतो.

* मुख्यमंत्र्याचे अधिकार :- भारतातील प्रत्येक घटक राज्या
मुख्यमंत्र्यास खालील अधिकार राज्यघटनेने दि
आहेत. या अधिकारापैकी काही महत्वाचे अधिक
खालीलप्रमाणे आहेत.

1) मंत्रीमंडळाची (मंत्रीपरिषदेची) निर्मिती करणे :- भारतातील प्रत्येक घटक राज्यात
ल मुख्यमंत्र्याला मुख्यमंत्री पदाची शपथ घेत
नंतर मंत्रीपरिषदेच्या निर्मितीचे काम करावे लाग
मंत्रीपरिषदेची निर्मिती हे मुख्यमंत्र्याचे सर्वात महत्वा
काम आहे. राज्यातील व आपल्या पक्षातील महत्व
त्या व्यक्तींना मुख्यमंत्री मंत्रीपरिषदेवर घेत
असतो. मुख्यमंत्री मंत्री परिषदेत ज्यांचा
समावेश करेल त्या सर्वांचा मंत्रीपरिषदेतील सदस्य
म्हणून राज्यपालास स्विकार करावा लागतो. विविध
जाती जमाती यांना मंत्रीपरिषदेतील सहभागी करून
घ्यावे लागते.

2) खाते वाटप करणे :- मंत्री परिषदेत घेतलेल्या प्रत्येक
सभासदाला एका खात्याची जबाबदारी देणे मुख्यमं-

त्याचा अधिकार आहे. दिलेले खाते काढून घेणे, दुसरे खाते देणे हाही अधिकार मुख्यमंत्र्याला च आहे.

मंत्रीपरिषदेतील सदस्यांना खाते वाटप करताना अनुभव, ज्येष्ठता, पक्ष श्रेष्ठीची मर्जी व जातीय प्रमाण आणि सदस्यांचे पक्षातील स्थान व योग्यता यांचा विचार करावा लागतो. तसेच प्रत्येक विभाग व खात्यांच्या संदर्भात विधानसभा व विधान परिषदेत उत्तर देण्याचे ही काम मुख्य मंत्र्याला करावे लागते.

3) मंत्र्याची निव बडतर्फी करणे:

मंत्री परिषदेचे सामुहिक जबाबदारी हे एक तत्व आहे. मंत्री परिषदेतील सर्व सदस्य मुख्यमंत्र्यांचे नेतृत्व आणि सामुहिक धोरणात विश्वास ठेवणारे असावेत. एखादा मंत्री मंत्रीपरिषदेच्या धोरणापेक्षा वेगळे धोरण घेत असेल, मंत्री परिषदेच्या बैठकीस उपस्थित राहत नसेल त्याच्या विभागा संदर्भात मुख्यमंत्र्याने दिलेले आदेश पाळत नसेल. मुख्यमंत्र्याच्या विचाराशी सहमत नसेल अशा वेळी मुख्यमंत्री त्या मंत्र्यास स्वत: राजीनामा देऊन मंत्री परिषदेतून बाहेर पडण्यास सांगतो तरी ही एखादा मंत्री मंत्रीपरिषदेतून बाहेर पडत नसेल तर त्यास मुख्यमंत्री राज्यपालास सांगून मंत्रीमंडळातून बडतर्फ करतो.

4). मंत्रीमंडळ बैठकीचे अध्यक्ष स्थान भूषविणे:

मुख्यमंत्री हा शासनाचा प्रमुख

वास्तविक कार्यकारी प्रमुख
असतो. मुख्यमंत्री हा मंत्रीमंडळाचा नेता व
असतो. त्यामुळे त्याला मंत्रीमंडळाचा अध्यक्ष
अध्यक्ष म्हणून संबोधले जाते. मुख्यमंत्रीच बैठ
नात्याने मंत्रीमंडळाची बैठक मुख्यमंत्र्याच्या अध्यक्ष
तो. मंत्रीमंडळाची बैठक मुख्यमंत्र्याच्या अध्यक्ष
खालीच होते. मंत्रीमंडळाच्या बैठकी समोरचे
विषय व कामकाजाची दिशा मुख्यमंत्रीच ठर

5) राज्यपालास माहिती देणे :-
राज्यपाल हा घटकराज्याचा
घटनात्मक प्रमुख असतो. राज्याचा सर्व कारभा
राज्यपालाच्या नावानेच चालतो. कलम 163(1)
नुसार मुख्यमंत्री हा राज्यपालाच्या कामात
राज्यपालाला मदत करण्यासाठी मंत्रीपरिषदसह उपस्थि
त असतो. या कलमानुसार मुख्यमंत्र्याला मंत्री
रिषदेने शासन व प्रशासना संबंधी घेतलेल्या
सर्व निर्णयाची माहिती राज्यपालाला द्यावी लाग
मुख्यमंत्री हा राज्यपाल व मंत्रीमंडळ यांच्यातील
दुवा असतो.

6) विधानसभेचा नेता :-
मुख्यमंत्री विधानसभेतील बहुमता
च्या पक्षाचा नेता असतो. यामुळे त्यास विधानस
चे नेते पद प्राप्त होते. विधानसभेचे नेते
असल्यामुळे राज्यपाल मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानेच
विधिमंडळाचे अधिवेशन बोलावतो. त्याच्याच सल्ल्या
ने राज्यपाल विधानसभा बरखास्त करतो विधान
सभेचे कार्यक्रम मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यानेच निश्चित

केले जातील. जातात.

७) विविध विभागात सहकार्य निर्माण करणे :-
मुख्यमंत्री मंत्रीपरिषदेचा नेता असतो मुख्यमंत्री मंत्रीपरिषदेच्या बैठकीचे अध्यक्ष स्थान भूषवितो. मंत्रीपरिषदेचा अध्यक्ष, नेता व शासनाचा प्रमुख असल्यामुळे मुख्यमंत्र्यास विविध खात्यामध्ये समन्वय व सहकार्य निर्माण करावे लागते. विधीमंडळात शासनाच्या धोरणावर किंवा एखाद्या मंत्र्याच्या कार्यपद्धतीवर टिका होत असेल तर त्यास मुख्यमंत्री स्वतः उत्तर देतो. आपला राज्यकारभार सुरळीत चालवा व कार्यकाळ पूर्ण व्हावा यासाठी शासनास व शासनातील सर्वांना सहकार्य करण्याची भूमिका मुख्यमंत्र्याला घ्यावी लागते.

8) उच्च अधिकाऱ्यांच्या नेमणूका करणे :-
मुख्यमंत्री राज्याचा महाधीवक्ता राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य आणि राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त इ. च्या नियुक्त्याबाबत राज्यपालाला सल्ला देतो. याशिवाय मुख्यमंत्र्यास राज्य नियोजन आयोगाचा अध्यक्ष म्हणून काम करावे लागते. अंतरराज्य परिषद व निती आयोगाचा सदस्य असल्यामुळे या संदर्भात मुख्यमंत्र्यास पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली काम करावे लागते.

मुख्यमंत्री राज्याचा नेता असतो. त्यामुळे राज्यात येणाऱ्या विविध परराज्यीय व परराष्ट्रीय व्यक्ती, समाजातील विविध वर्ग, प्रसार माध्यम

यांच्याशी चर्चा करणे त्यांचे प्रश्न ऐकणे त्या प्रश्नाला उत्तर देणे व राज्याचे धोरण प्रसार माध्यमांच्या मदतीने जनतेला सांगा इत्यादी अधिकार व कामे मुख्यमंत्र्यास लागतात.

1) राज्याचे धोरण निश्चित करणे.
2) राज्यपालाला महत्त्वाच्या नेमणुका करण्यामध्ये सल्ला देणे.
3) राज्यासाठी आवश्यक कायदे बनवणे.
4) राज्यपालाचे अभिभाषण तयार करणे.
5) विधीमंडळात कोणते विधेयक केव्हा व मांडायचे हे ठरवणे.
6) विधानसभेत विरोधी पक्षाने व पक्षातील ने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देणे.
7) राज्याच्या आर्थिक विकासाचे धोरण तयार करणे
8) केंद्र सरकारच्या सूचनेनुसार व निर्देशानुसार आपले धोरण तयार करणे.
9) राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्या संदर्भ महत्त्वाचे निर्णय घेणे.
10) विधीमंडळात मांडलेल्या विधेयकाला मंजूर घेणे.

वरील सर्व कार्य घटकराज्याच्या मंत्री काला करावी लागतात.